# नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०१० मधील निशाणी क्र. १३८ वरील आदेश
## (गुराप्पा व इतर वि. बाबु व इतर)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींना तातडीने तोंडी पुरावा देणेचा आदेश करणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १४० कडे देण्यात आले आहे.

२) प्रस्तुत अर्जात वादींतर्फे असे कथन करण्यात आले आहे की, प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरूद्ध निरंतर ताकिदीकरिता दाखल केला आहे. सदर दाव्याचे सुनावणी कामी वादी व वादींचे साक्षीदार व काही प्रतिवादींचा व त्यांच्या साक्षीदारांचा तोंडी पुरावा नोंदविण्यात आलेला आहे. या प्रकरणी उर्वरित प्रतिवादींचा तोंडी पुरावा नोंदविल्यानंतर सदरचे प्रकरण जवळ जवळ युक्तिवादावरच ठेवले जाणार होते. तथापि, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. ११६ कडे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करावी म्हणून अर्ज दाखल केला. त्याकामी मे. न्यायालयाने दि. १३/०३/२०१८ रोजी प्रतिवादींचा कोर्ट कमिशन नियुक्तीचा अर्ज मंजूर केल्याने वादींनी त्या आदेशावर नाराज होऊन तातडीने मा. मुंबई उच्च न्यायालयात धाव घेऊन दिवाणी याचिका क्र. ३९८२/२०१८ ही दाखल केली. ती याचिका मे. उच्च न्यायालयाने दि. १९/०७/२०२२ रोजी निकालात काढून मे. न्यायालयास काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. त्याचा थोडक्यात तपशील असा की, सदरच्या अंशतः सुनावणी झालेल्या दाव्याची संपूर्ण सुनावणी ६ महिन्याच्या आत पूर्ण करावी, सुनावणी चालू असताना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ चा कोर्ट कमिशन नियुक्तीचा अर्ज मंजूर करता येत नाही, असे निःसंदिग्धपणे निकालपत्रातील कलम १९ मध्ये स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे कोर्ट

कमिशन नियुक्तीचा आता प्रश्न उद्भवत नाही, यदाकदाचित प्रस्तुत दाव्याचा अंतिम युक्तिवाद झाल्यानंतर मे. न्यायालयास काही गोष्टींचे स्पष्टीकरण होणे आवश्यक वाटल्यास त्यावेळी कोर्ट कमिशनची नियुक्ती मे. न्यायालय करू शकते. परिणामी कोर्ट कमिशन नियुक्तीचा सद्य स्थितीत कोणताही प्रश्न उद्भवत नाही, हे याचिकेच्या झाल्या निकालपत्रामधून ठळकपणे स्पष्ट होते.

३) वादींचे पुढील कथन असे की, वादी यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केली याचा अर्थ नव्याने कोर्ट कमिशनचा अर्ज देण्यास अथवा पूर्वीचाच निशाणी क्र. ११६ चा अर्ज पुढे चालविण्याचा हक्क व अधिकार प्रतिवादींना मे. उच्च न्यायालयाने दिलेला नाही. तसा गैरअर्थ काढणे चुकीचे ठरणार आहे. सबब, उर्वरित प्रतिवादी व त्यांचे काही साक्षीदार असल्यास त्यांचा तोंडी पुरावा तातडीने सुरू करण्याबाबत आदेश करण्यात यावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आलेली आहे.

४) प्रस्तुत प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जास असे म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज, मतितार्थ व केलेली मागणी पूर्णपणे गैरलागू असून केवळ वेळकाढूपणा करणेचा वादींचा हेतू आहे. वादींचा अर्ज प्रामाणिकपणाचा नाही. वास्तविक येनकेन प्रकारे सदर कामी मे. न्यायालयाने निशाणी क्र. ११६ कडे केले आदेशाची अंमलबजावणी होऊ नये असा वादींचा हेतू आहे.

५) प्रस्तुत प्रतिवादींचे पुढील प्रतिकथन असे की, मे. उच्च न्यायालयातील आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये निशाणी क्र. ११६ चा आदेश रद्द केलेला नाही वा सदर आदेशाची अंमलबजावणी करवू नये असे कोठेही नमूद नाही. उलट ज्या ठिकाणी हद्दीचा व अतिक्रमीत क्षेत्राचा प्रश्न निर्माण होतो.

अशा वेळी तज्ञ मोजणीदार यांची नियुक्ती होऊन सत्यता पडताळून न्यायनिवाडा व्हावा अशा स्वरूपाचा आशय निघतो. वास्तविक प्रस्तुत कामी प्रतिवादींनी सत्य वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर येण्याकरता वादी व प्रतिवादी यांचे जमिनीची एकत्रित मोजणी व्हावी म्हणून निशाणी क्र. ११६ कडे अर्ज दिलेला आहे.

६) प्रतिवादींचे पुढील प्रतिकथन असे की, वास्तविक निशाणी क्र. ११६ कडील मे. न्यायालयाचा आदेश दि. १३/०३/२०१८ रोजी झालेला आहे. त्या आदेशाचा वादी यांनी रिट पिटीशन दाखल केले. सदर कामातील नोटीसा सन २०२२ पर्यंत या प्रतिवादींना रुजू केल्या नाहीत. म्हणून त्या कामी सदर प्रतिवादी वकिलांमार्फत स्वतः हजर होऊन कामकाज चालविले. त्यानंतर त्या कामी दि. १९/०७/२०२२ रोजी आदेश झाला. सदर आदेशाची पूर्तता मे. न्यायालयात प्रतिवादींनी करून निशाणी क्र. ११६ चे आदेशाची अंमलबजावणी तातडीने व्हावी म्हणून विनंती प्रार्थना केल्या. त्यास ही कसा विलंब करता येईल याच्या क्लृप्त्या वादी शोधत राहिला व त्यांनी प्रस्तुत अर्जाची शक्कल लढवून अर्ज दाखल केलेला आहे. तो प्रामाणिकपणाचा मुळीच नाही.

७) प्रतिवादींचे पुढील प्रतिकथन असे की, वास्तविक कमिशन झालेस वादींचे काहीच नव्हेतर काडीमात्र देखील नुकसान होणार नाही. उलट कमिशन झालेस न्यायदानाचे कामी मदतच होणार आहे. प्रतिवादींनी मे. उच्च न्यायालयामध्ये दिले आदेशाचा कोणताही गैरअर्थ काढलेला नाही. सबब, वादींचा अर्ज नामंजूर करण्यात येऊन कमिशनची कामगिरी तातडीने पाठविण्यात येऊन मुदतीचे बंधन घालून अहवाल मागविण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

८)　　अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

९)　　प्रस्तुत अर्जातील विनंतीचा प्रकरण संचिकेतील दावा, कैफियत, या टप्प्यापर्यंत नोंदविण्यात आलेला पुरावा, मा. उच्च न्यायालयाने दिवाणी याचिका क्र. ३९८२/२०१८ चे कामी दि. १९/०७/२०२२ रोजी पारित केलेला आदेश यांचे अनुषंगाने विचार केला असता सर्वप्रथम ही बाब नमूद करणे जरुरीचे आहे की, मा. उच्च न्यायालयाने वर नमूद दिवाणी याचिकेचे कामी पारित केलेल्या आदेशामध्ये वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे विनंती केल्याप्रमाणे प्रतिवादींना त्यांचा तोंडी पुरावा तातडीने सुरू करण्याचे आदेश पारित करणे आवश्यक असल्याचे वादीने दर्शवून दिले आहे काय हे पाहणे आवश्यक आहे. सदर विनंतीच्या पार्श्वभूमीवर वादीचे विधिज्ञांनी सादर केलेल्या युक्तिवादानुसार व अर्जात केलेल्या कथनानुसार मा. उच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद दिवाणी याचिकेच्या आदेशामध्ये परिच्छेद क्र. १९ मध्ये दाव्याची सुनावणी चालू असताना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचा अर्ज मंजूर करता येत नाही असे निःसंदिग्धपणे म्हणले आहे या वादीच्या कथनामध्ये तथ्य आहे किंवा कसे ही बाब प्रस्तुत अर्जाच्या गुणदोषावर निर्णयासाठी तपासणे जरुरीचे आहे.

१०)　　सदर बाबीची तपासणी करीत असताना मी मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाप्रती अत्यंत आदराची व विनम्रतेची भावना व्यक्त करून असे नमूद करू इच्छितो की, मा. उच्च न्यायालयाने आदेशाचे परिच्छेद क्र. १९ मध्ये मा. उच्च न्यायालयासमोर दिवाणी याचिकेच्या सुनावणीचे कामी प्रस्तुत वादीचे वतीने काम पाहणारे विधिज्ञांनी त्यांचे युक्तिवादाचे समर्थनार्थ भिस्त ठेवलेल्या **Shaikh Isak s/o Shaikh Amir Vs. State of Maharashtra & Anr. 2011**

<u>**(3) ALL MR 361**</u> या न्यायनिर्णयातील न्यायतत्वाचा उपयोग दिवाणी याचिकेचे कामी वादींना होतो किंवा कसे या बाबीचा ऊहापोह व कारणमीमांसा नमूद करीत असताना असे निरीक्षण नोंदविले आहे की, सदरच्या उपरोक्त नमूद Shaikh Isak चे प्रकरणातील आदेशामधील दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ अन्वयेचा अर्ज पुरावा पूर्ण झाल्यानंतर विचारात घेता येणार नाही असे निरीक्षण समजून घेता येत नाही. याउलट उभय पक्षकारांनी त्यांचा पुरावा सादर केल्यानंतर जर न्यायालयास अभिलेखावरील महत्त्वपूर्ण बाबींची स्पष्टीकरण आणि विश्लेषण करून घेणे आवश्यक वाटल्यास न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करता येऊ शकते असे मत नोंदविले आहे. परंतु सदर निरीक्षणाच्या अनुषंगाने केवळ वादीने कथन केल्याप्रमाणे प्रतिवादींचा निशाणी क्र. ११६ कडील न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचा अर्ज मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणामध्ये उभय पक्षकारांचा पुरावा पूर्ण झाल्यानंतरच विचारात घेण्यात यावा असे कोणतेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत अथवा तसे कोणतेही बंधन या न्यायालयास घालून दिलेले नाहीत.

११) याउलट मा. उच्च न्यायालयाने दिवाणी याचिकेचे आदेशाचे परिच्छेद क्र. २१ मध्ये स्पष्टपणे या न्यायालयाने प्रस्तुत दाव्यातील निशाणी क्र. ११६ चे अर्जावरील पारित केलेल्या आदेशामध्ये कोणताही फेरबदल करण्याची जरुरी नसल्याचे नमूद करून परिच्छेद क्र. २२ मधील आदेशाप्रमाणे वादींची दिवाणी याचिका फेटाळून लावली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाचा विचार केला असता वादींनी निशाणी क्र. ११६ कडील न्यायालयीन आयुक्त नेमणुकीच्या अर्जावरील आदेशावर नाराज होऊन दाखल केलेली दिवाणी याचिका फेटाळून लावली असल्यामुळे प्रस्तुतच्या दाव्यामध्ये यापूर्वीच या न्यायालयाचे तत्कालीन विद्वान पीठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र. ११६ वर पारित केलेला आदेश

सद्यस्थितीत अंतिम झाला आहे. त्यामुळे सदर आदेशाप्रमाणे पुढील प्रक्रिया करणे न्यायाचे व जरुरीचे आहे. अशा परिस्थितीत वादींनी मा. उच्च न्यायालयाचा उपरोक्त नमूद दिवाणी याचिकेचे कामी पारित केलेला आदेश आव्हानीत केला असल्याचे देखील दर्शवून दिले नसल्यामुळे यापूर्वीच निर्णित करण्यात आलेल्या निशाणी क्र. ११६ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती करून त्यांचा अहवाल मागविण्यापूर्वीच प्रतिवादींना त्यांचा तोंडी पुरावा देण्याचे निर्देश देण्यासारखा कोणताही अन्वयार्थ मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचा काढता येणार नाही वा तसा स्पष्ट निर्देश देखील मा. उच्च न्यायालयाने दिलेला नाही असे माझे विनम्र मत आहे.

१२) याउलट मा. उच्च न्यायालयाने त्यांचे आदेशामध्ये परिच्छेद क्र. १५ चे अंतिम भागात न्यायालयाने हद्दीखुणांबाबत व अतिक्रमाणाबाबत वाद असलेल्या दाव्यांमध्ये संपरिक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करून त्यांचा अहवाल मागविल्याशिवाय वाद मुद्दा केवळ तोंडी पुराव्याआधारे पूर्णतः व परिणामकारकपणे निर्णित करता येणार नाही असे स्पष्ट मत नोंदविले आहे. अधिक स्पष्टतेसाठी मा. उच्च न्यायालयाचे आदेशामधील संबंधित मजकूर मी पुनरूद्धृत करीत आहे.

> **That apart, the power to appoint court commissioner for local inspection is not fettered by the stage of the proceeding. Ultimately, the endevour of any court should be to ascertain the truth. While no straight jacket formula can be applied, the power under order 26 rule 9 can be exercised at any stage of proceeding and even at the appellate stage, if the condition necessary for exercise of such power exists. In the present case the dispute indubitably involves the boundaries and encroachment. In the absence of report of an expert it may not**

**be possible for the learned trial judge to ascertain the truth and effectively and completely adjudicate the controversy merely on the basis of the oral evidence.**

१३) वरील सर्व कारणमीमांसेचा विचार केला असता वादींचा प्रस्तुतचा अर्ज व त्यामध्ये केलेली विनंती यामध्ये कोणतेही तथ्य नसल्याने तो नामंजूर होण्यास पात्र आहे असे माझे मत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश मूळ संपरिक्षेअंती पारित करण्यात येतो.

EKNATH KOYAPPA CHOUGALE

Digitally signed by EKNATH KOYAPPA CHOUGALE
Date: 2023.01.04 12:18:29 +0530

स्थळ:– जत　　(एकनाथ को. चौगले)

दि. २१/१२/२०२२　　(JO Code -MHSN2400)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

जत

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस.ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २१/१२/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २३/१२/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०४/०१/२०२३. |